# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**दौंड तालुक्यातील भीमा नदी काठावरील पुर नियंत्रण रेषा निश्चित करण्याबाबत**

**(१) ३५०५ (२३-१२-२०१४). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भीमा नदीस पावसाळ्यामध्ये वारंवार येणा-या मोठ्या पुरांमुळे दौंड तालुक्यातील नदी काठच्या व दौंड शहरामधील (जि.पुणे) नागरिकांना पुराच्या कालावधीमध्ये विस्तापित व्हावे लागत असल्याने भीमा नदीच्या काठावरील गावांमध्ये व दौंड शहरामध्ये धोकापातळी मार्क करुन पुररेषा निश्चित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भीमा नदी काठावरील दौंड तालुक्यातील गावांमधील व दौंड शहरामधील धोकादायक पातळी मार्क करुन पुर नियंत्रण रेषा निश्चित करण्याबाबतच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, दिनांक २७ जुलै, २००६ रोजी सर्किटहाऊस पुणे येथे झालेल्या तत्कालीन जलसंपदा मंत्री व तत्कालीन लोकप्रतिनिधी यांच्या बैठकीतील इतिवृत्तास कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे यांनी पत्र जा.क्र.मकृखोविस/(२५९६/७००/०६)/मोप्र-२/७३०२ दिनांक ३१ ऑगस्ट, २००६ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार भीमा नदीच्या काठावर असलेल्या दौंड तालुक्यातील व दौंड शहरातील पुर रेषेच्या आतील लोकांचे पुर्नवसन करण्यासाठी केंद्र शासनाकडून येणा-या निधीमधून कार्यवाही करावी असा निर्णय होवूनही अद्यापही या बाबतची कार्यवाही करण्यात आली नसल्याने, त्याबाबतची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०९-२०१५) :**(१) नाही.

(२) पुररेषा आखणी करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून मागणी प्राप्त झाली नसल्याने कार्यवाही सुरु करण्यात आलेली नाही.

(३) केंद्र शासनाकडून पूनर्वसन कामासाठी निधी उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

**सालोरा तालुक्यातील खुर्द येथील नागरिकांना स्मशानभुमीसाठी जागा देण्याबाबत**

**(२) ५६९३ (०८-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील सोफिया कंपनीने टाकलेल्या रेल्वे रुळामध्ये सालोरा तालुक्यातील तालुक्यातील खुर्द येथील बौध्द समाजाच्या स्मशानाची जागा बळकावल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सालोरा खुर्द येथील नागरिकांना स्मशानभुमीसाठी जागा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) सालोरा खुर्द जि.अमरावती येथील बौध्द समाजाच्या स्मशानभूमीसाठी वापरण्यात येणारी जागा श्री.विजय नारायणसिंह जाधव यांच्या खाजगी मालकीची आहे. सोफिया कंपनीने टाकलेल्या रेल्वे लाईनमध्ये सदर जागेचा समावेश आहे. त्यामुळे स्मशानभुमीसाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे बाबत सोफिया कंपनीकडे गावकऱ्यांनी परस्पर मागणी केली आहे. याबाबत तहसीलदारा अमरावती यांच्यामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरेगाव भिमा (ता.शिरुर, जि.पुणे)येथे विजय रणस्तंभात सोयी सुविधा देण्याबाबत**

**(३) ६२८५ (०६-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरेगाव भिमा (ता.शिरुर, जि.पुणे) येथे विजय रणस्तंभाला मानवंदना देण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लाखो अनुयायी उपस्थित राहिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरेगाव भिमा येथील विजय रणस्तंभास देशभरातून लाखो अनुयायी भेट देत असताना या ठिकाणी कुठल्याही सुविधा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी शौचालय, निवासस्थान, स्वच्छ पाणी, बगीचा इ. सुविधा उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१५) :**(१) होय.
(२) होय.

(३) सदरच्या ठिकाणी रणस्तंभाची मूळ जागा ही सदन कमांड, पुणे १ यांचेकडे देखभालीसाठी आहे. त्याठिकाणी बाहेरील एजन्सीला काम करण्यास परवानगी नाही. तसेच संरक्षक भिंतीव्यतिरिक्त बाहेरील जागा ही खाजगी मालकीची असल्यामुळे तेथे इतर सुविधा देता येत नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्वच जिल्हा परिषदा व ग्रामपंचायत स्तरावर विविध कल्याणकारी योजनांतर्गत खरेदी शासन दरपत्रकानुसार ठराविक पुरवठादरानुसार करण्याबाबत**

**(४) ७२२३ (०७-०४-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्वच जिल्हा परिषदा व ग्रामपंचायत स्तरावर विविध कल्याणकारी योजनांतर्गत खरेदी शासन दरपत्रकानुसार ठराविक पुरवठादरानुसार करण्यात यावे असे शासनाचे आदेश आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरपत्रकातील वस्तूची प्रतवारी किंमत ही स्थानिक बाजारपेठेत मिळणा-या वस्तूपेक्षा कमी आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारच्या वस्तूंची खरेदी करणा-या अधिकार स्थानिक प्राधिकरणास देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१५) :**(१) ग्राम विकास व जलसंधारण शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/२७५/प्र.क्र.१७२/पंरा-७, दिनांक १९.१०.२०११ नुसार ज्या ज्या वस्तू व सेवांसाठी दरकरार केलेले आहेत. त्या वस्तू नमूद यंत्रणेकडूनच खरेदी करण्यात याव्यात. मात्र शासन दरकरारानुसार वस्तू/साहित्ये खरेदी करताना वस्तूचा दर्जा व प्रत दर्जेदार आहे याची खातरजमा करावी, असे निर्देश आहेत.
(२) शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग क्र.झेडपीए-२००९/प्र.क्र.५०५/वित्त-९, दिनांक ६.८.२००९ अन्वये दरकरारातील दर हे संपूर्ण राज्यासाठी असून वेगवेगळ्या ठिकाणी स्थानिक बाजारपेठेत तेथील वस्तू उत्पादक संस्था दर्जानुसान आधारीत दर वेगवेगळे असू शकतात. तथापि शासनाच्या खरेदी धोरणानुसार (शा.नि.उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग दि.२.१.१९९२ व ४.२.२००३) केवळ वस्तूचे दर हा महत्वाचा मुद्दा नसून समाजाच्या उपेक्षीत वर्गासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना आरक्षणाच्या माध्यमातून स्थायी रोजगार मिळवून देण्याची व शासकीय / निमशासकीय खरेदीद्वारे स्थानिक / उद्योजक यांना बाजारपेठ मिळवून देणे अशी शासनाची व्यापक भूमिका आहे.
(३) शासन दरपत्रकासंदर्भात राज्याचे धोरण स्वतंत्रपणे उद्योग, उर्जा व कामगार विभागामार्फत ठरविण्यात येत असून त्यावरील अंतिम निर्णयानंतर याबाबत उचित निर्णय होईल.

---

**गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील हडलगेनजीकचा लमाणवाडा मुलभूत सोयीपासून वंचित असल्याबाबत**

**(५) ८७५२ (०७-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील हडलगेनजीकचा लमाणवाडा मुलभूत सोयीपासून वंचित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लमाणवाडा गावाची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर लमाणवाडाला मुलभूत सुविधा देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय. मौजे हडलगे पैकी लमाणवाडा येथे इयत्ता १ ली ते ४ थी प्राथमिक शिक्षण, एक विंधन विहीरीद्वारे पाणीपुरवठा, १८ कुटुंबांपैकी १२ कुटुंबांना इंदिरा आवास घरकुल योजनेचा लाभ दिला आहे. ग्रामपंचायतीमार्फत तीन सौर पथदिवे बसविण्यात आले आहेत. राष्ट्रीय पेयजल नळ पाणीपुरवठा, स्ट्रीट लाईट व रस्ता खडीकरण या योजना मंजूर आहेत. तथापि, लमाणवाडीच्या सभोवती वन विभागाची हद्द येत असल्याने त्याच्या परवानगी अभावी अद्याप कामे सुरु करण्यात आलेली नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चाळोबावाडी (ता.आजरा, जि.कोल्हापूर) गाव मुलभूत सोयी सुविधापासून वंचित असल्याबाबत**

**(६) ८७५४ (०७-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चाळोबावाडी (ता.आजरा, जि.कोल्हापूर) या ३०० लोकवस्तीच्या गावांतील नागरीक मुलभूत सोयी सुविधापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गावाला मुलभूत सोयीसुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) होय. मौजे चाळोबावाडी हे महसुली गाव ग्रा.पं.किणे मध्ये समाविष्ट असून येथे विद्युत पंपाद्वारे नियमित पाणीपुरवठा, इयत्ता १ ली ४ थी प्राथमिक शिक्षण, स्वतंत्र मिनी

अंगणवाडी, आरोग्य उपकेंद्र (किणे), स्टीट लाईटस् इ. सुविधा उपलब्ध आहेत. तसेच, ग्रा.पं.किणे मार्फत चाळोबावाडी येथे नियमित गटर दुरुस्ती, रस्त्यांची स्वच्छता केली जाते. जिल्हा नियोजन समितीमार्फत रु.१०.०० लक्षचे रस्ता खडीकरण, डांबरीकरण काम पूर्ण झाले आहे. चाळोबावाडी येथील ४० कुटुंबांपैकी ३५ कुटुंबांकडे शौचालय आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील महागाव-मासेवाडी इंचलनाळ-हरळी रस्ता, महागाव-हारूर, महागांव-सुळे हरही खुर्द-वैरागवाडी रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(७) ८७७४ (१०-०४-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील गडहिंग्लज साखर कारखान्यांच्या उसाच्या गाडया जाऊन महागाव-मासेवाडी इंचलनाळ-हरळी रस्ता, महागाव-हारूर, महागांव-सुळे हरही खुर्द-वैरागवाडी आदी रस्त्याची मोठया प्रमाणात दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर रस्त्यांची दुरूस्ती करण्यासाठी विशेष निधीची तरतूद करून रस्ते दुरूस्ती करण्याची मागणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार सदर रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून रस्त्याची कामे तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३), (४) व (५) प्रश्नधिन ४ रस्त्यांपैकी महागांव ते हारुर राज्य मार्ग क्र.२०१ (लांबी २.३० कि.मी.) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे. सदर रस्ते वाहतुकीस योग्य असून दुरुस्तीची आवश्यकता नाही.

सद्य:स्थितीत उर्वरित ग्रामविकास विभागाच्या अखत्यारीतील तिनही रस्त्यावरुन एस.टी. वाहतूक सुरु आहे. सदर रस्त्यांच्या खराब लांबीतील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकष यांच्या अधिन राहून करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**पंचायत समिती (जि.नागपूर) अंतर्गत किरणापूर/हिवराबाजार येथे सुरु असलेले सिमेंट रस्ते निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(८) ९५२१ (०८-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती (जि.नागपूर) अंतर्गत किरणापूर/हिवराबाजार येथे सुरु असलेले सिमेंट रस्ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकृष्ट कामांची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१५) :**(१) नाही.

(२) सन २०१३-१४ मध्ये मौजा किरणापूर व मौजा हिवराबाजार येथे सिमेंट रस्त्याचे कोणतेही काम करण्यात आलेले नाही. तथापि, ग्रामपंचायत हिवराबाजार अंतर्गत मौजा फुलझरी येथे सिमेंट रस्त्याचे काम सन २०१३-१४ मध्ये करण्यात आले असून सदर काम सुस्थितीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्ह्यातील एरंडोल, भडगांव व पाचोरा पंचायत समितीच्या नविन इमारतीच्या बांधकामाचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(९) १००१७ (०८-०४-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील एरंडोल, भडगांव व पाचोरा पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारती पाडून त्या ठिकाणी नविन इमारतीच्या बांधकामाचे प्रस्ताव शासन स्तरावर ब-याच दिवसांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर पंचायत समित्यांच्या इमारती ४० ते ४५ वर्षापूर्वीच्या असून कालबाह्य झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्ताव केव्हा संमत करण्यात येणार आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१५) :**(१) नाही.

(२) व (३) एरंडोल, भडगाव व पाचोरा पंचायत समितीच्या अस्तित्वातील प्रशासकीय इमारतींचे बांधकाम सन १९६२ पुर्वीचे आहे. सदरहु इमारतींची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगाव यांच्याकडून अनुदानाच्या उपलब्धतेनुसार करण्यात येते.

एरंडोल, भडगाव व पाचोरा पंचायत समितीच्या अस्तित्वातील प्रशासकीय इमारती जुन्या असल्यामुळे त्या ठिकाणी नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांच्या स्तरावर प्रगतीत आहे.

---

## सोलापूर जिल्हयातील भीमा नदीवरील बंधा-याच्या दुरुस्तीबाबत

**(१०) १०३२६ (०७-०४-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील येथील भीमा नदीवरील पटवर्धन कुरोलीतील कोल्हापूर पध्दतीचा बंधाऱ्याची दारे खराब झाल्याने पाणीसाठा पूर्ण क्षमतेने होत नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच सोलापूर जिल्हयातील भीमा नदीवरील टाकळी (टें.) व रुई या दोन कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याला गळती लागल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

तथापी खराब झालेल्या बंधाऱ्याच्या दाराची दुरुस्ती करुन व उपलब्ध दारे सुयोग्य नियोजन करुन पाणी पुर्ण क्षमतेने अडविण्यात येते.

(२) अंशत: खरे आहे.

खराब झालेल्या बंधाऱ्याच्या दाराची दुरुस्ती करुन व उपलब्ध दारे सुयोग्य नियोजन करुन पाणी पुर्ण क्षमतेने अडविण्यात येते.

(३) होय.

(४) को.प. बंधाऱ्यांचे दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर चालु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अपंग बांधवांच्या विविध मागण्यांबाबत

**(११) १०४९७ (०९-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रहार अपंग संघटनेच्या वतीने नाशिक जि.प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी दालनात गांधीगिरी आंदोलन दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलनादरम्यान देण्यात आलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, अपंगाच्या प्रश्नांवर २२ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी, दरम्यान मुंबईत अपंग बांधवांनी आपल्या मागण्यासाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०७-२०१५) :**(१) होय.
(२) अंशत: पूर्तता करण्यात आली आहे.
(३) होय.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील वांबोरी चारी रोहित्र दुरूस्ती अभावी व थकित वीजबीला अभावी सदर योजना बंद असल्याबाबत**

**(१२) १०७१० (०७-०४-२०१५). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील वांबोरी चारी रोहित्र दुरूस्ती अभावी व थकित वीजबीला अभावी सदर योजना बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी देखभाल दुरूस्ती व वीजबील थकबाकीसाठी निधींची तरतूद नसल्याने आवर्तन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आवर्तन न सुटल्याने राहुरी, नगर, पाथर्डी व नेवासे तालुक्यातील ४३ गावंतील सुमारे तीन हजार ६०० हेक्टर क्षेत्रांचे सिंचन व पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,

(६) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) व (५) सदर योजनेचे परिचालन व दुरुस्ती कामांसाठी निविदा कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे. सदर कामांसाठी लागणारा निधी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देऊन ही कामे पुर्ण करण्याचे नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदुरा तालुक्यातील मौजे नांदुरा खु. ते रा.म.क्र. ६ पर्यंतच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१३) १०७३८ (०७-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदारसंघातील नांदुरा तालुक्यातील मौजे नांदुरा खु. ते रा.म.क्र. ६ पर्यतचा रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य

नागरिक दुचारी व चारचाकी वाहनधारकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु.१० लक्ष निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) उपरोक्त रस्त्याची मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग खामगांव यांना वेळोवेळी सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०१४-१५ मधील प्रस्तावांमध्ये या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदुरा तालुक्यातील मौजे बेलाड ते पिंगळेश्वरी देवी पर्यंतच्या रस्त्यांची दुरवस्था झाल्याबबात**

**(१४) १०७३९ (०७-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदारसंघातील नांदुरा तालुक्यातील मौजे बेलाड ते पिंगळेश्वरी देवी पर्यतचा रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरिक दुचाकी व चारचाकी वाहन धारकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु.१० लक्ष निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) उपरोक्त रस्त्याची मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग खामगांव यांना वेळोवेळी सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही, जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे निमसागर (ता.इंदापूर, जि.पुणे) येथील चौकीच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१५) १०९७० (०८-०४-२०१५). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निमसागर (ता.इंदापूर, जि.पुणे) येथे देखभालीसाठी पाटबंधारे खात्याने लाखो रुपये खर्चुन बांधण्यात आलेली चौकी दुर्लक्षित झाली असल्याने सदर चौकीची इमारत कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५) :**(१) नाही.

(२) तथापि या चौकीची पाहणी करण्यात आली आहे.

(३) सदर चौकीचे बांधकाम ब्रिटीशकालीन असुन सन १८८५ ते १८८९ च्या दरम्यान बांधकाम झाला आहे. चौकीची पुर्णतः पडझड झाली असुन सध्या वापरण्या योग्य नाही. सदर चौकी दुरुस्ती करण्या योग्य राहिलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**काचुरवाही-खोडगांव (जि.नागपूर) येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१६) १११०५ (०९-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काचुरवाही-खोडगांव (जि.नागपूर) या मार्गावर रात्रदिवस जडवाहतूक होत असल्यामुळे या मार्गाची दुरवस्था झाली असून या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत स्थानिकांनी व लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याची दुरुस्ती लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :**(१) मा. लोकप्रतिनिधीनी निवेदन दिले आहे.

(२) काचुरवाही-खोंडगांव हा रस्ता रस्ते विकास आराखडा सन २००१-२०१२ नुसार ग्रामीण मार्ग क्र.१३४ दर्जाचा रस्ता आहे. या रस्त्याची प्रत्यक्षात २.१५० कि.मी. लांबी आहे. सदर लांबीपैकी ०.६०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. तसेच ०.४५० कि.मी. लांबीतील दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले असून १.१०० कि.मी. लांबीतील दुरुस्तीचे काम प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अडोळ लघुप्रकल्पाच्या (ता.मालेगाव, जि.वाशिम) बुडीत क्षेत्रातील माणुसमारीकडे जाणा-या उंच पुलाच्या बांधकामाबाबत**

**(१७) ११५०८ (०६-०४-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील अडोळ लघुप्रकल्प ता.मालेगांव च्या बुडीत क्षेत्रातील माणुस मारीकडे जाणा-या शेतक-यांसाठी वाधी बु.गावाजवळ उंच पुलाचे बांधकाम प्रस्तावित केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उंचपुलाच्या बांधकामासंदर्भात जलसंपदा विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रे व आराखडे मागितले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या बांधकामास शासनाने मान्यता दिली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय व याबाबत शासनाची भुमिका काय ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०७-२०१५) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे, उंच पुलाच्या बांधकामा संदर्भात जलसंपदा विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुलाचे संकल्पन मागविले आहे.

(३) नाही.

(४) सद्य:स्थितीत पुलाचे संकल्पन संकल्पचित्र मंडळ (पुल) नागपूर यांच्याकडून अप्राप्त आहे.

---

**वाशिम जिल्ह्यातील पैनगंगा नदीवरील को.प.बंधा-यामधून पाण्याची गळती होत असल्याबाबत**

**(१८) ११५१५ (०६-०४-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील पैनगंगा नदीवरील बाळखेडा, भापुर, धोरपुरु, मसळापेन, आसेगावपेन, येवती ही को.प.बंधारे जवळपास २० ते २५ वर्षापूर्वीची जुनी असल्यामुळे या को.प.बंधा-यामधून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर को.प.बंधा-यांच्या दुरुस्तीसाठी विशेष बाब मधून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींने दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५) :**(१) होय.

(२) लोकप्रतिनिधींची मागणी होती. मात्र लोकप्रतिनिधी यांचे लेखी निवेदन उपलब्ध नाही.

(३) या बंधाऱ्याची जलयुक्त शिवार योजनेतंर्गत दुरुस्ती प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम जिल्हयातील लघु पाटबंधारे योजना सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी बंद असल्याबाबत

**(१९) ११५२४ (०७-०४-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील पांग्राबरी, मिर्झापूर, पळसखेड, चाकातिर्थ, मैरालडोह, वाडीरायताळ, वाकद या लघु पाटबंधारे योजना सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ल.पा.योजनांचे सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना ओ.आय.बी.बी. व राज्यपालांच्या निर्देशाअंतर्गतच्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या ल.पा.योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५) :**(१) नाही. पाग्राबंदी ल.पा. योजनेस आर्थिक वर्षे सन २०१२-१३ व २०१३-१४ मधील सु.प्र.मा. किंमतीपेक्षा जास्त खर्च करण्याची परवानगी शानि. दि.१८.१.२०१४ व २८.५.२०१४ चे निर्णयान्वये देण्यात आली असून मैराळडोह, मिर्झापूर व पळसखेड या ल.पा. योजनांना आर्थिक वर्ष सन २०१३-१४ मधील सु.प्र. मान्यतेपेक्षा जास्त खर्च करण्याची परवानगी शासन निर्णय दि. २५.५.२०१४ अन्वये देण्यात आलेली आहे. तथापि या योजनांना सुप्रमाची आवश्यकता नाही.

(२) मैराळडोह ल.पा. योजनेचा सुप्रमा प्रस्ताव शासनाचे जलसंपदा विभागात तपासणीत असून मिर्झापूर ल.पा.यो. चा सुप्रमा प्रस्तावावरील शासन उपस्थित शेऱ्यांची पुर्तता क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे. पाग्राबंदी, पळसखेड, चाकतीर्थ, वाडीरायताळ व वाकद या प्रकल्पाचे सुप्रमा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे सादर केले असून तपासणीत आहे.

(३) होय.

(४) होय.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील खारपाण पट्ट्यात येत असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाचे पाणी पाईप लाईनमधून करण्याबाबत

**(२०) ११६३० (०६-०४-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील खारपाण पट्ट्यात येत असलेल्या पाटबंधारे प्रकल्पाचे पाणी पारंपारीक कालवे प्रणाली ऐवजी बंद पाईप लाईनमधुन करण्याबाबत माहे ऑगस्ट, २००१ मध्ये वा त्यादरम्यान

तत्कालीन जलसंपदा राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रस्तावास दिनांक ४ डिसेंबर, २०१३ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नियामक मंडळाच्या सभेमध्ये मान्यता प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्यक्षात सदर प्रणाली वापरण्यास सुरुवात केली आहे काय,

(४) असल्यास, प्रत्यक्ष कार्यान्वयन करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५) :**(१) विदर्भातील खारपाण पट्ट्यातील नेरधामणा, उमा, काटेपुर्णा, घुगंशी या सर्व प्रकल्पांसाठी पाईपद्वारे सिंचन करण्याबाबतचा निर्णय ०९/०८/२०११ रोजी तत्कालीन राज्य मंत्री, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये झाला होता.

(२) नियामक मंडळाचे दि.०४/१२/२०१३ चे ५४ व्या बैठकीमध्ये उमा बॅरेज नं-२ (नेरधामणा) व घुगंशी बॅरेज या विदर्भातील खारपाणपट्ट्यातील प्रकल्पाबाबत कालव्या ऐवजी बंद पाईपलाईनद्वारे काम करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली होती.

(३) सदर बदलास सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन सदर कामे हाती घेण्यात येणार आहेत.

(४) सु.प्र.मा. कार्यवाही प्रगतीत आहे. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारोळा पंचायत समितीच्या (जि.जळगांव) इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२१) ११६४२ (०६-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा पंचायत समितीची (जि.जळगांव) इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत असून ती केव्हाही कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता असल्यामुळे त्या जागी नविन इमारत बांधण्यात यावी अशी मागणी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास तेथील लोकप्रतिनिधींनी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१५) :**(१) लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे.

(२) पारोळा पंचायत समितीच्या इमारतीचे बांधकाम सन १९६२ साली करण्यात आले असून, सार्वजनिक बांधकाम मंडळ जळगाव यांचेकडून अनुदानाच्या उपलब्धतेनुसार इमारतीची देखभाल व निगा ठेवण्यात येते.

पारोळा पंचायत समितीची असितत्वातील इमारत जुनी असल्यामुळे त्या ठिकाणी नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचा सविस्तर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांच्या स्तरावर प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कसवण (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायत येथील झोपडी स्टॉप कलेश्वर मंदिर रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२२) ११८९० (०८-०४-२०१५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.रविंद्र चव्हाण (डोंबिवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसवण (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायत येथील झोपडी स्टॉप कलेश्वर मंदिर हा ९०० मीटरच्या रस्त्यास ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत जिल्हापरिषद, सिंधुदुर्ग येथे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्याचे नूतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) जिल्हा परिषद सिंधुदुर्गकडे मागणी प्राप्त नाही.

(३) झोपडी स्टॉप कलेश्वर मंदीर रस्ता रस्ते विकास आराखडा २००१-२०२१ नुसार ग्रामीण मार्ग क्र. ३९४ दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०.८५० लांबी डांबरी पृष्ठभागाची ०.१५० लांबी मातीचा पृष्ठभाग असलेली तर उर्वरीत १.०० कि.मी. अस्तित्वात नसलेली लांबी आहे. डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे बुजविण्याचे काम रस्ता कामगारांकडून करण्यात येत असून त्याची दुरुस्ती व मातीच्या पृष्ठभागाच मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**वरोरा (जि.चंद्रपूर) येथील भानुसखिंडी धरणाची उंची वाढविण्याबाबत**

**(२३) १२३७७ (०८-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) मध्ये भानुसखिंडी धरणांची उंची कमी असल्याने आसपासच्या गावांना पूराचा धोका उद्‌भवत असल्याने या धरणांची उंची वाढविण्याची मागणी तेथील नागरिकांनी वारंवार संबंधित विभागाकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणाची उंची वाढविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५)** :(१), (२) व (३) नाही.

सदर बंधाऱ्याचे काम पुर्ण झालेले नाही.

प्रकल्पासाठी आवश्यक जमीन ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात येते त्यामुळे प्रकल्पास उच्चतम न्यायालयाची व केंद्रीय वन्यजीव मंडळाची तसेच केंद्रीय पर्यावरण व वन विभागाची मान्यता घेणे गरजेचे आहे. मुळ बंधारा कामासच अद्यापी मान्यता नसलेने उंची वाढविण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

---

### राजापूर (जि.रत्नागिरी) शहरातील नदीतील गाळ काढण्याबाबत

**(२४) १२४०३ (०८-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) शहरातील नदीचा गाळ उपसा न काढल्यामुळे गतवर्षीप्रमाणे यावर्षीही पावसाळ्यात शहरवासियांना जीव मुठीत घेऊन राहावे लागत असल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर नदीपात्रातील गाळ उपसण्याच्या कामाला मंजूरी मिळून त्याकरिता अंदाजे दोन कोटी रुपये खर्च करुनही लघुपाटबंधारे तांत्रिक विभागाने काम हाती घेऊन गाळाचा उपसा करण्याचे काम सुरु केले परंतु उपसलेला गाळ नदीपात्राच्या दुतर्फा डंपिंग करुन ठेवण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गाळ नदीपात्राच्या दुतर्फा ठेवण्यात आल्यामुळे मोठया प्रमाणात गाळ पूर्ववत नदीपात्रात सामावला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) अशंत: खरे आहे.

सदर काम महात्मा फुले जलभूमी संधारण अभियानाच्या धर्तीवर यांत्रिकी संघटनेची यंत्रसामुग्री विनामोबदला वापरुन, इंधन व वंगणाच्या खर्चाच्या रु.५४.१६ लक्षचे प्रस्तावास मदत व पुनर्वसन विभाग यांनी रु. ३५.०० लक्ष किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन दिला. त्यामध्ये गाळ वाहतूक करुन बाहेर टाकण्याच्या खर्चाची तरतूद नसल्याने उपसलेला गाळ नदीपात्राच्या दुतर्फा रचून ठेवण्यात आला. या कामापोटी दोन कोटी रुपये झालेला नसून वरील उपलब्ध निधीच्या मर्यादेत रु. २९.३१ लक्ष इतकाच खर्च झाला आहे.

(३) अशंत: खरे आहे.

सदरचा गाळ नदीकाठी काही प्रमाणात घट्ट बसलेला आहे. तरीही पावसाळ्यात सदरचा गाळ काही अंशी पुन:श्च नदीपात्रात सामावला जात आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

उपरोक्त प्रमाणेच अंदाजपत्रकातच अशी तरतूद असल्याने चौकशीची कार्यवाही करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पोफळी सय्यदवाडी (जि.चिपळूण जि.रत्नागिरी) नदीकिनारी वसलेली असून नदी काठाची मोठ्या प्रमाणात धूप झालेली असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाल्याबाबत**

**(२५) १२४३२ (०८-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोफळी सय्यदवाडी (जि.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील काही लोकवस्ती नदीकिनारी वसलेली असून नदी काठाची मोठ्या प्रमाणात धूप झालेली असल्यामुळे पावसाळ्यात नदीला येणा-या पूराचे पाणी नदीचा प्रवाह बदलून मोठ्या प्रमाणात लोकवस्तीत घुसत असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना तसेच दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांना ग्रामस्थांच्या संरक्षणार्थ योग्यती कार्यवाही होणे बाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

चिपळूण शहराची रचना ही भौगोलीकदृष्ट्या खाडी किनारी वसलेल्या गावामध्ये मोडत असून, पावसाळ्यात अतिवृष्टीच्या वेळी भरती असल्यास व त्याचवेळी कोयना अवजल सोडण्यात आल्यास पूरपरिस्थितीत गंभीर स्वरुप धारण करते.

नदीकाठाची मोठ्याप्रमाणात धूप झालेली असल्यामुळे नदीचे पात्र रुंद झालेले आहे. सदर ठिकाणी नदीचा प्रवाह बदलत नाही. तथापि अतिवृष्टीच्या काळात पाणी पात्राबाहेर पसरते.

(२) होय, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना तसेच दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा.राज्यमंत्री जलसंपदा यांना निवेदन दिलेले आहे.

(३) वशिष्टी नदीमधील गाळ काढणे व संरक्षक भिंत बांधणेचे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र असुर्डे हे गेली दोन वर्षापासून बंद असल्याबाबत

**(२६) १२४३७ (०८-०४-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) प्राथमिक आरोग्य केंद्र असुर्डे हे गेली दोन वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्र बंद असल्यामुळे सदर परिसरांतील सात-आठ गावांतील नागरिकांना आरोग्य सेवेसाठी सुमारे २० कि.मी. अंतरावर जावे जागत असल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावर असलेले सदरचे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०७-२०१५) :**(१) सदर दवाखाना हा प्राथमिक आरोग्य केंद्र नसून जिल्हा परिषदेचा दवाखाना आहे व तो दिनांक २८/२/२००७ पासून बंद आहे.

(२) हे खरे नाही.

सदर गावापासून ८ कि.मी. अंतरावरील सावर्डे गावी प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्यातून असुर्डे गावाला मोफत आरोग्य सुविधा दिल्या जातात.

(३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडील, जा.क्र.रजिप/आवि/आस्थार३/२४७८/१३ दिनांक २० मार्च, २०१३ चे पत्राने मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना तसेच पत्र क्र.रजिप/आवि/आस्था/२/अ/९१४५/१३ दिनांक ११ ऑक्टोबर, २०१३ ने सहसंचालक, आरोग्य सेवा (प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्हा परिषद स्तर) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना सदरील जिल्हा परिषद दवाखाना सुरु करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अजिंठा ग्रामपंचायतीच्या गलथान कारभारामुळे येथील आठवडी बाजारात सांडपाणी शिरल्याबाबत

**(२७) १२५२० (०८-०४-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजिंठा ग्रामपंचायतीच्या गलथान कारभारामुळे येथील आठवडी बाजारात सांडपाणी शिरल्याने ग्रामस्थांना घाणीतच बाजार करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव व्यापा-यांसह ग्रामस्थ संतापले असून स्वच्छतेअभावी गावात फिरणे मुश्कील झाले असुन नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याने शासनाने त्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०४-०७-२०१५)** :(१) नाही. अजिंठा गावामधील (ता.सिल्लोड) निजामकालीन व जुन्या असलेल्या पिण्याच्या पाण्याची सिमेंटची पाईपलाईन जीर्ण झाल्याने त्यामधून पाण्याची गळती झाल्यामुळे अजिंठा गावाच्या आठवडी बाजारात पाणी शिरले होते.
(२) नाही. दि.१५.३.२०१५ रोजी जुनी पाईपलाईन बंद केलेली असून भारत निर्माण योजनेच्या टप्पा क्र.२ अंतर्गत अजिंठा गावामध्ये मोठ्या व्यासाच्या पाईपलाईनचे काम पूर्ण झाले असून नवीन पाईपलाईद्वारे गावाला सुरळीतपणे पाणी पुरवठा सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## वर्धा जिल्हयाच्या विकास कामांच्या प्रस्तावाबाबत

**(२८) १२७४४ (०८-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हयाच्या सर्वांगिण विकासासोबत ग्रामीण क्षेत्रातील रस्ता नुतनीकरण, ग्राम पंचायत भवन बनविण्याकरिता २० लाखाचा निधी जिल्हा वार्षिक योजनेमध्ये मंजूर करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विकास कामांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१५)** :(१) जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत रस्ते विकासाकरीता सन २०१४-१५ करीता रु.६६७.६५ लक्ष तसेच ग्रामपंचायत भवनांची एकूण ३३ कामे व दहन दफन भूमिचा विकास कार्यक्रम अंतर्गत एकूण १३९ कामांना एकूण रु. ९९८.८६ लक्ष मंजूर करण्यात आले.
(२) सदर विकास कामे जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेली आहेत.
(३) रस्ते विकासाच्या एकूण ८८ कामांपैकी १७ कामे पूर्ण करण्यात आली असून ७१ कामे प्रगतीत आहेत. तसेच ग्रामपंचायत भवन व दहन व दफन भूमीचा विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर कामांचा निधी पंचायत समिती मार्फत ग्रामपंचायत स्तरावर वाटप करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील गायरानातील सामाजिक वनीकरणात होत असलेली अवैद्य वृक्षतोड

**(२९) १२९२३ (०८-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील गायरानातील सामाजिक वनीकरणातील वृक्षांची बेसुमार तोड करुन वनीकरणातील मुरुम, मातीची बेसुमार उपसा होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जैनापूर, निमशिरगांव, तमदलगे, दानोही, कोंडिग्रे, टाकळी, धरणगुंत्ती, नांदणी, चिपरीसह, तालुक्यातील अशी वनीकरणे वृक्षतोडीने उजाड झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषीवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे असून ग्रामपंचायत जैनापरू हद्दीतील गायरानातील सामाजिक वनीकरणातील वृक्षांची तोड अज्ञात इसमाने केल्याची बाब सन २०१२ मध्ये निदर्शनास आली आहे तर ग्रामपंचायत टिपरी हद्दीतील गायरानातील सामाजिक वनीकरणातील वृक्षांची नासधुस रानटी व पाळीव जनावरांकडून झालेली आहे. उर्वरीत गावांच्या ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गायरानातील सामाजिक वनीकरणातील वृक्षांची तोड झालेली नाही.

(३) ग्रामपंचायत जैनापरू यांनी तहसिलदार शिरोळ व पोलिस निरीक्षक, जयसिंगपूर पोलिस ठाणे यांच्याकडे दि. १४/८/२०१२ रोजी तक्रार दाखल केलेली असून अद्यापि चौकशी सुरु आहे.

(४) चिपरी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील जमीन रिकामी व मोकळी असून जैनापूर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गायरानाबाबतची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

गट नं.१२९ - गावठाण विस्तार वाढ

गट नं.१५३ - गावतलाव

गट नं.२२० - पुर्नवसनासाठी भूमीसंपादन

गट नं.४९६ - गावठाण वाढ

गट नं.२४० - पुन:श्च वृक्ष लागवड करुन संरक्षणासाठी ग्रामपंचायतीकडे आहे.

गट नं.३५७ - वाढीव गावठाण

त्याचप्रमाणे सर्व गायरान क्षेत्रांची मोजणी करुन गायरान गटाचे हद्द - शिवकडेला चर खुदाई करण्याचा ठराव ग्राम पंचायतीने केला आहे.

---

**गांव भांबेड (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील भांबेड, पेठदेव ते डोलारखिंड (गांव हर्दखळे) या जिल्हा अंतर्गत जोड रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत**

**(३०) १३०५७ (१०-०४-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांबेड (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील भांबेड, पेठदेव ते डोलारखिंड (गांव हर्दखळे) या जिल्हा अंतर्गत जोड रस्त्याची दुरुस्तीची मागणी माहे जून, २०१३ मध्ये वा त्यादरम्यान विभागातील भांबेड बौध्द विकास मंडळ, विभागातील जागरुक नागरीक, लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (ग्रामविकास), मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम), मा.राज्यमंत्री (ग्रामविकास), जिल्हाधिकारी (रत्नागिरी) यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरील रस्त्याच्या दुरुस्तीचे काम किती नियत कालावधीत पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रश्नांकित भांबेड हर्दखळे डोलारखिंड हा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार इतर जिल्हा मार्ग क्र. १२९ असा असून त्याची प्रत्यक्षात लांबी १३.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते ५/०० कि.मी. डांबरी पृष्ठभाग ५/०० ते ५/९०० कि.मी. खडीचा पृष्ठभाग तर ५/९०० ते १३/०० अस्तित्वात नसलेली लांबी आहे.

तेरावा वित्त आयोगाअंतर्गत ०/०० ते १/३९५ कि.मी. लांबीतील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण सन २०१४-१५ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत अस्तित्वातील रस्त्याच्या नादुरुस्त लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधी व निकषाच्या अधिनतेने टप्प्या-टप्प्याने हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**मानोरा (जि.अकोला) तालुक्यातील अनेक गावांत मनरेगाच्या कामात बनावट मजूर दाखवून पदाधिकारी यांनी पदाचा गैरवापर केल्याबाबत**

**(३१) १३२०६ (०८-०४-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानोरा (जि.अकोला) तालुक्यातील उमरी बु. उमीर खुर्द, शेन्दोना, सावळी, सोयजना, दापुरा, उज्वलनगर, पिंपळशेडा, असोला खु. वसंतनगर, वनउमरी सह. अनेक गावांत मनरेगाची कामे यंत्रणा सुरु आहेत तर काही गावातील कामे बनावट मजूर दाखवून पदाधिकारी आपल्या पदाचा गैरवापर करुन करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कंत्राटदार व संबंधित अधिका-यांवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०८-२०१५)** :(१) या संदर्भात आयुक्त नरेगा, नागपूर यांच्याकडे दि. ३/२/२०१५ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) होय.
(३) आयुक्त (नरेगा) नागपूर यांनी नियुक्त केलेला द्विसदस्यीय चौकशी समिती मार्फत याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

चौकशीत तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी ६०:४० चे प्रमाण न राखता मोठ्या प्रमाणात कुशल ची देयके अदा करणे तसेच मोठ्या प्रमाणात प्रशासकीय मंजूरी दिल्याचे निदर्शनास आल्यामुळे तत्कालनी गट विकास अधिकारी यांच्यावर विभागीय चौकशी प्रस्थापित करण्यात आली आहे व सहाय्यक लेखा अधिकारी यांनी गैरहजर असलेल्या मजुरांची मजूरी FTO द्वारे प्रदान केली त्यामुळे सदर रकमेच्या वसूली बाबत त्यांना नोटीस देण्यात आली आहे. त्याच प्रमाणे CDEO यांनी मस्टर मध्ये गैरहजर मजूर हजर दाखवून रक्कम खात्यात जमा केल्यामुळे त्यांच्यावर FIR दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औंसा (जि.लातूर) तालुक्यातील तावराजा मध्यम प्रकल्पातील सांडवा व गेट (द्वारे) नादुरुस्त असल्याबाबत

**(३२) १३२७० (०८-०४-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंसा (जि.लातूर) तालुक्यातील तावराजा मध्यम प्रकल्पातील सांडवा व गेट नादुरुस्त असल्याने सदर प्रकल्पातून पाण्याची मोठ्या प्रमाणावर गळती होत असल्याने सदरील सांडवा व गेटची दुरुस्ती करुन पाण्याची गळती थांबविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या सांडवा व गेटची दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी किती खर्च येत असून सदर दुरुस्तीचे काम मंजूर करुन निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०९-२०१५) :**(१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. ४.३.२०१५ च्या निवेदनाद्वारे अशा प्रकारची मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे.
(२) सांडव्या मधून होणारी गळती थांबविण्यासाठी सन २०११-१२ मध्ये नियमित परिरक्षण व दुरुस्ती अनुदानातून सांडवा भिंतीची दुरुस्ती केली आहे. सदरील दुरुस्ती मुळे सांडण्यातून होणारी गळती थांबलेली आहे.

यांत्रिकी संघटनेस व्दार तपासणी करुन दुरुस्ती हाती घेण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
(३) सांडवा दुरुस्तीसाठी रु. ३.५३ लक्ष इतका खर्च झाला आहे.

गेट दुरुस्तीसाठीचा निधी नियमित परिरक्षण निधीतून आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील उल्हास, बारवी, भातसा व काळू नद्यांच्या पात्रात अनधिकृत बांधकामे होत असल्याबाबत**

**(३३) १३३१२ (०८-०४-२०१५). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील उल्हास, बारवी, भातसा व काळू नद्यांच्या पात्रात अनधिकृत बांधकामे होत असून त्यांच्या काठावर बांधलेल्या फार्म हाऊस विनापरवाना पाण्याचा उपसा करत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेकडो लिटर पाणी विनापरवाना वापरले जात असतांना लघु पाटबंधारे विभाग याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करीत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१५) :**(१) नदी पात्रात व नदी काठावर जी बांधकामे होतात त्यांचे संनियंत्रण जलसंपदा विभागामार्फत होत नाही. तथापि, या नद्यांचे पाणी सिंचन व बिगर सिंचनासाठी पाणी वापरले जाते. उल्हास नदीवर एकूण ११९ पाणी वापरकर्ते, बारवी नदीवर एकूण ४७ पाणी वापरकर्ते, भातसा नदीवर एकूण १७४ पाणी वापरकर्ते आहेत, भातसा नदीवर ४ बिगर सिंचन पाणी वापरकर्ते प्रस्तावित आहेत व काळू नदीवर एकूण ०७ पाणी वापरकर्ते पाणी वापरत आहेत. पाणी वापरकर्ते नियमित पाणीपट्टी भरत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर मतदार संघातील ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते, समाजभवन बांधकामाबाबत**

**(३४) १३५०१ (०८-०४-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर मतदार संघातील ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते, समाजभवन बांधकामासाठी "२५१५" या मुख्यलेखा शिर्षक ग्रामविकास विभाग अंतर्गत निधी मंजूर करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०१४ आणि ५ जानेवरी, २०१५ ला मा.ग्रामविकास मंत्री यांना सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने चंद्रपूर मतदार संघातील ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते बांधकामासाठी लेखाशीर्ष २५१५१२३८, अंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षमध्ये रु.१००.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत बांभुळगाव (ता.बांभुळगाव, जि.यवतमाळ)येथे मनरेगा अंतर्गत झालेला गैरव्यवहार**

**(३५) १३८०० (०८-०४-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत बांभुळगाव (ता.बांभुळगाव, जि.यवतमाळ) मनरेगा अंतर्गत ६७ मजूर दाखवून २६.४९ लक्ष रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पांदन रस्ता मंजूर असताना खाजगी लेआउट मधील अंर्तगत रस्त्याचे खडीकरणाच्या कामावर मनरेगा अंतर्गत मजूर दाखविण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मनरेगा अंतर्गत मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन दोषीवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

मग्रारोहयो अंतर्गत ग्राम पंचायत बाभुळगांव येथे सन २०१४-१५ मध्ये पांदण रस्त्याचे काम मंजूर नसून गांव अंतर्गत खडीकरणाचे काम मंजूर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर जिल्हा परिषद मुलींचे वसतिगृह जागे अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३६) १३८१४ (०८-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषद मुलींचे वसतिगृह इमारतीचे बांधण्यासाठी जि.प.कडून निधीची तरतूद केली होती. परंतु जागा उपलब्ध नसल्याने इमारतीचे काम प्रलंबित आहे असे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जागा उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१५) :**(१) सोलापूर जिल्हा परिषद मुलींचे वसतीगृह बांधण्यासाठी सन २०१३-१४ मध्ये मुळ अंदाजपत्रकात स्वउत्पन्नमधून तरतूद केली होती. तथापि, शिक्षण विभागाकडून सदर निधी अन्य बाबीवर वळविण्यात आला असल्याने निधी अभावी सदर काम हाती घेण्यात आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुर्तिजापूर मतदार संघातील सिंचनाच्या अडचणींबाबत

**(३७) १३८९९ (०८-०५-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापूर मतदार संघातील सिंचनाच्या अडचणींबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (मुर्तिजापूर) यांनी दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू तालुक्यातील सिंचनाच्या अडचणी दूर करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०७-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) उमा बॅरेज प्रकल्पाचा चार गावांचे पुनर्वसना आराखडा तसेच वाई ल.पाल. प्रस्ताव सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत.

तसेच सन २०१५-१६ च्या आर्थिक वर्षात अधिक्षक अभियंता, अकोला पाटबंधारे मंडळ, अकोला यांना मध्यम प्रकल्पांच्या परिरक्षण व दुरुस्तीकरिता रु.२१८.६३ लक्ष इतका आणि २५० हेक्टरवरिल व २५० हेक्टरखालील ल.पा.प्रकल्पांच्या परिरक्षण व दुरुस्तीकरीता अनुक्रमे रु.१२५.४३ लक्ष व रु.३२.१७ लक्ष इतका निधी अर्थसंकल्पीय आहे. वित्त विभागाच्या निर्देशानुसार सदर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ७० टक्के इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील खारपाणपट्टयातील महत्वपूर्ण जल प्रकल्पांचे काम सुधारीत प्रशासकीय मान्यतेसह विविध कारणामुळे प्रलंबित असल्याबाबत**

**(३८) १३९५७ (०८-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील खारपाणपट्टयातील महत्वपूर्ण जल प्रकल्पांचे काम सुधारीत प्रशासकीय मान्यतेसह विविध कारणामुळे प्रलंबित असल्याने जिल्ह्यातील ३६ हजार ८०० हेक्टर जमीन तहानलेली असुन शेतक-यांना सिंचनापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यातील खारपाण पट्यातील एकुण आठ प्रकल्प (१ मोठा, १ मध्यम व ६ लघु प्रकल्प) आहेत. या आठ प्रकल्पांपैकी चार प्रकल्पांना सुप्रमा ची आवश्यकता असून दोन प्रकल्पांवर भुसंपादन अभावी व पुनर्वसन अडचणीमुळे अपेक्षीत प्रगती साध्य करता आलेली नाही. उर्वरित दोन प्रकल्पांचे कामे प्रगतीत आहे. या आठ प्रकल्पांमुळे एकुण २१८८६ हे क्षेत्रावर सिंचन सुविधा निर्माण होऊ शकल्या नाहीत.

(२) सुप्रमा आवश्यक असलेल्या चार प्रकल्पांपैकी दोन प्रकल्पांचे (बोर नदी लपायो व वाघाडी बॅरेज) सुप्रमा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून एका प्रकल्पाचा (सामदा सौंदड) सुप्रमा प्रस्ताव रा.तां.स.स. नाशिक कडे तपासणीखाली आहे व उर्वरित एक प्रकल्पाचा (चंद्रभागा बॅरेज) सुप्रमा प्रस्ताव प्रादेशिक स्तरावर आहे. तथापि, शासनाने सदर चार प्रकल्पांना सन १३-१४ मधील वितरीत निधी खर्च करण्याची परवानगी दिल्याने प्रकल्पांची कामे प्रगतीत आहेत. उर्वरित दोन प्रकल्पांवरील भुसंपादन व पुनर्वसन पुर्ण करण्याचे काम प्रगतीत असून अन्य दोन प्रकल्पांची कामे सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इंडीया बुल औष्णिक विज प्रकल्पाला अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा करण्यात आल्याबाबत**

**(३९) १४०४० (०८-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतीचे पाणी वळवून नांदगांव पेठ जि.अमरावती स्थित इंडीया बुल औष्णिक विज प्रकल्पाला अप्पर वर्धा धरणातून पाणी पुरवठा करण्यात आला असून या पाणी पुरवठा मोबदला म्हणून कौंडण्यपूर बॅरेज करीता रु. २३२ कोटीचा निधी पुर्नस्थापना खर्च म्हणून देण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निधी शासनाकडे जमा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या निधी अंतर्गत कौंडण्यपूर बॅरेजचे काम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाकरीता दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (११-०९-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

अप्पर वर्धा धरणातून इंडिया बुल औष्णिक विज प्रकल्पाला ८७.६० दलघमी पाणी आरक्षण दि. २१/०२/२००८ नुसार देण्यात आले आहे. यासाठी सिंचन पुर्नस्थापना खर्च म्हणून एकूण रु.२३२.१८ कोटी कंपनीकडून येणे आहे. कंपनीने आजपर्यंत एकूण रु.११६.५७ कोटी रकमेचा भरणा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे केला आहे. मात्र सदर रकमेतुन कौंडण्यपुर बॅरेज बांधण्याचे प्रस्तावित नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोनबर्डी, हनुमंत खेडा (ता.एरंडोल, जि.जळगाव) येथील गावांचे पुनर्वसनाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४०) १४०६३ (०७-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनबर्डी, हनुमंत खेडा (ता.एरंडोल, जि.जळगाव) येथील गावांचे पुनर्वसनाचे काम अद्यापही झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावाचे पुनर्वसन न झाल्यामुळे तेथील रहिवाश्यांना धोक्याच्या क्षेत्रात (डेंजर झोन) वास्तव्य करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावाचे पुनर्वसन न होण्याची सर्वसाधारण कारणे कोणती,

(४) असल्यास, या गावांचे पुनर्वसन होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०९-२०१५)** :(१) होय,

अंजनी मध्यम प्रकल्पाच्या वाढीव उंचीनुसार सोनबर्डी, हनुमंतखेडे बु. व हनुमंतखेडे मजरे या ३ गावांचे पुनर्वसन करणे प्रस्तावित आहे.

(२) नाही.

आजमितीस मुळे उंचीनुसार अंजनी धरणात पाणीसाठा करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) अंजनी उंची वाढ प्रकल्पाअंतर्गत मौजे सोनबर्डी, हनुमंतखेडे बु.हनुमंतखेड मजरे या गावांचे पुनर्वसनासाठी वसंत सहकारी साखर कारखान्याची जागा सर्वानुमते दि.२५/२/२०१३ रोजी निश्चित करणेत आली होती. तथापि, कालांतराने कारखान्याच्या दुर्गंधीमुळे सदर पुनर्वसन गावठाण्याच्या जागेस ग्रामस्थांनी विरोध दर्शवला आहे.

उक्त गावांचे पुनर्वसनाबाबत सर्वमान्य तोडगा काढणेसाठी क्षेत्रिय स्तरावर प्रयत्न चालू आहेत.

---

**महाराष्ट्र शासन ग्रामपंचायत जनसुविधा योजनेअंतर्गत प्रत्येक समाजास स्मशानभुमी, दफनभूमी, वॉल कंपाऊड, सरकता दरवाजा, ग्रामसचिवालय बांधण्याबाबत**

**(४१) १४०९५ (०८-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासन ग्रामपंचायत जनसुविधा योजनेअंतर्गत प्रत्येक समाजास स्मशानभुमी, दफनभूमी, वॉल कंपाऊड, सरकता दरवाजा, ग्रामसचिवालय बांधणे यादी कामासाठी एका गावात जास्ती-जास्त १० लाखचा निधी देते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मिरज तालुक्यातील मौजे बेडग, आरग, म्हैसाळ, नरवाड, लिंगनुर, मालगांव, खंडेराजुरी, कवलापूर, सोनी, भोसे या मोठया गावामध्ये प्रत्येक समाजाचे लोक राहतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय बदलून ज्या गावाची लोकसंख्या जास्त आहे अशा गावांना निधी जास्त देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१५)** :(१) होय.

(२) होय.

(३) सद्यस्थितीत याबाबत कोणताही निर्णय शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय सेवेतील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांची कामे कंत्राटी पध्दतीने (बाहय यंत्रणेमार्फत) करून घेण्याबाबत

**(४२) १४१४६ (०७-०४-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय सेवेतील तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांची कामे कंत्राटी पध्दतीने (बाहय यंत्रणेमार्फत) करून घेण्याचे शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती विभागांनी या कंत्राटी पध्दतीचा अवलंब केला आहे,

(३) असल्यास, या कंत्राटी पध्दतीचे स्वरुप काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०८-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) आतापर्यत सामान्य प्रशासन विभाग, नियोजन विभाग, विधि व न्याय विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, संसदीय कार्य विभाग, महिला व बालविकास विभाग व अल्पसंख्यांक विकास विभाग या विभागांमध्ये या पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, दि. २७ सप्टेंबर, २०१० अन्वये नवीन पदनिर्मितीचे प्रस्ताव सादर करताना शासकीय कार्यालयातून वर्षानुवर्षे केली जाणारी, पण सध्याच्या बदललेल्या स्थितीत जी सहजपणे बाहेरुन करुन घेता येतील, अशी कामे शासकीय कर्मचाऱ्यांकडून घेण्याऐवजी ती शक्यतो बाह्य यंत्रणेकडून (Outsourcing द्वारे) करण्याचे पर्याय अवलंबावेत असे सूचित करण्यात आले होते. बाह्य यंत्रणेकडून (Outsourcing द्वारे) कामे करुन घेण्याबाबत मार्गदर्शक सुचना शासन परिपत्रक, वित्त विभाग, दि. २ फेब्रुवारी, २०१३ व दि. २ डिसेंबर, २०१३ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

वर नमूद शासन परिपत्रकातील तरतूदी विचारात घेऊन, बाह्ययंत्रणेकडून कामे करुन घेण्याकरिता शासन मान्य संस्थांकडून निविदा मागवून, त्यातील न्यूनतम दराची निविदा स्वीकारुन, त्या संस्थेसोबत करार केला जातो.

---

## भंडारा जिल्हयातील सोनकुंड प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४३) १४२७६ (०८-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात सोनकुंड प्रकल्प (धरण, सिंचन प्रकल्प) माहे जानेवारी, २०१५ पर्यंतही अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागाने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५)** :(१) होय. हे खरे आहे. सोनकुंड लघु पाटबंधारे प्रकल्प मौजा कोका ता.मोहाडी, जि.भंडारा येथील सोनकुंड नाल्यावर प्रस्तावित असून प्रकल्पाचे काम सन १९७५ मध्ये रोहयो अंतर्गत सुरु करण्यात आले होते. प्रकल्पास १३१.०८ हे वन जमिनीची आवश्यकता आहे. वन प्रस्तावास केंद्र शासनाच्या अंतिम मान्यतेअभावी प्रकल्पाचे काम संस्थगित करणेत आले आहे.

(२) सदर प्रकल्पाची अद्यावत किंमत रु.६६.८१ कोटी असून यामध्ये वन जमिनीसाठी एन.पी.व्ही.ची. रु.५५.११ कोटी व बांधकामासाठी रु.११.७० कोटी चा समावेश आहे. प्रकल्पाच्या बांधकामाच्या किमतीशी तुलना केली असता वनजमिनीसाठी लागणारा खर्च खुपच जास्त आहे. तसेच प्रकल्पासाठी लागणाऱ्या १३१.०८ हे. क्षेत्र सन २०१२ मध्ये घोषित झालेल्या नवीन नागझिरा अभयारण्यात समाविष्ट झाले आहे. त्यामुळे सदर प्रकल्पास मान्यता मिळणेची शक्यता कमी आहे.

तसेच सदर प्रकल्पाचे ५४६ हे. सिंचन क्षेत्र वैनगंगा नदीवर प्रस्तावीत असलेल्या सुरेवाडा उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रात समाविष्ट होत आहे. सुरेवाडा उपसा सिंचन योजना कार्यान्वित झाल्यावर सोनकुंड प्रकल्पाचे लाभक्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्प रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील सुळे डाव्या कालव्यावरील चाचरे पिळकोस शिवारात कालव्यावर मोऱ्या टाकण्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४४) १४४७७ (०८-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील उर्ध्वगोदावरी प्रकल्प विभाग नाशिक या विभागांअंतर्गत असलेल्या कडवा धरण उपविभाग कळवण या उपविभागाअंतर्गत सुळे डाव्या कालव्यावरील चाचरे पिळकोस शिवारात कालव्यावर मोऱ्या टाकण्याचे निकृष्ट दर्जाचे काम करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त कामाची चौकशी केलेली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर काय कारवाई करण्यात आलेली आहे वा येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५)** :(१) नाही. सदर कामांच्या आवश्यक्तेनुसार गुणनियंत्रण चाचण्या घेण्यात आला असुन त्यांचे अहवाल विनिर्देशातील मर्यादेत आलेले आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोदावरी कालव्यांवरील शेती पिकांसाठी उन्हाळ्यात पाण्याचे आवर्तन देणेबाबत**

**(४५) १४४९८ (०८-०४-२०१५). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी कालवे हे बारमाही कालवे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी कालव्यावरील शेती पिकांसाठी उन्हाळ्यात पाण्याचे आवर्तन देणार आहे काय,

(३) असल्यास, कोपरगांव परिसरातील शेतक-यांना पाणी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०९-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) दारणा धरणातून ३९८.४४ दलघफु, गंगापूर धरणातून १०८.०४ दलघफु प मुकणे धरणातून ७३८.०३ दलघफु, याप्रमाणे गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगाम २०१५ मध्ये पाणी सोडण्यात आले असून त्या पाण्यातून कोपरगावं परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी एक आर्वतन देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परळी (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथे स्मशान शेड बांधण्यासाठी जागा मिळण्याबाबत**

**(४६) १४८१६ (०८-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथे स्मशान शेड इमारत मंजूर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेड बांधण्यासाठी ग्रामपंचायतीकडे जागा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामपंचायतीने स्मशान शेडचे बांधकाम करण्यासाठी गावालगत असलेल्या गायरान मधील जागेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी व मुख्यकार्यकारी अधिकारी कोल्हापूर यांचे स्तरावर प्रलंबीत आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रस्तावास शासन तातडीने मान्यता देणार आहे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०७-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर प्रस्ताव ग्रामपंचायत स्तरावरच प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वणी शहराला पाणीपुरवठा करणारी जिवणदायिणी निर्गुडा नदी,**
**कोरडी पडण्याच्या मार्गावर असल्याबाबत**

**(४७) १५३१२ (०९-०४-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी शहराला पाणीपुरवठा करणारी जिवणदायिणी निर्गुडा नदी, कोरडी पडण्याच्या मार्गावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,नवरगांव धरणातील पाणी या नदीच्या पात्रात सोडले जात आहे, या वर्षी पावसाळ्यात पाणी अत्यल्प झाल्यामुळे नवरगांव धरणात पाणीसाठी कमी आहे. हे ही खरे आहे काय,

(३) सद्यस्थितीतील पाणी पुरवठा योजना पुरेसा पाणी पुरवठा करण्यास समर्थ आहे काय, नसल्यास त्यावर उपाययोजना काय,

(४) तसेच, वणी शहराला वर्धा नदीवरुन पाईप लाईन टाकल्यास वणीकरांची पाण्याची समस्या कायमची दुर होऊ शकते, हे खरे आहे काय, असल्यास शासन काही उपाय करणार आहे काय,

(५) असल्यास विलंबाची कारणे काय,

(६) वणी शहराला वर्धा नदीवरुन पाणी आणने सहज शक्य असताना कोणतीच कार्यवाही का केली नाही ?

**श्री. गिरीष महाजन (०९-१०-२०१५) :**(१) निर्गुडा नदीच्या पाणलोट क्षेत्रात होणाऱ्या पावसामुळे सर्वसाधारणपणे दरवर्षी नोव्हेंबर महिन्यापर्यंत या नदीत जलप्रवाह सुरु असतो व तद्नंतर ती कोरडी पडते. मात्र आवश्यकतेनुसार नदीपात्रात नवरगांव धरणातून पाणी सोडण्यात येते.

(२) नाही.

यावर्षी नवरगाव मध्यम प्रकल्पामध्ये १२.४७५९ द.ल.घ.मी. म्हणजेच उपयुक्त जलसाठ्याच्या १०० टक्के पाणीसाठा झाला होता.

यावर्षी नवरगांव धरणातून निर्गुडा नदीसाठी आरक्षीत केलेल्या २.०. द.ल.घ.मी. पाण्यापैकी १.१९ द.ल.घ.मी. पाणी वेळोवेळी निर्गुडा नदीच्या पात्रात मागणीनुसार सोडण्यात आले आहे व उर्वरीत पाणी मागणीनुसार नदी पात्रात सोडण्याचे नियोजित आहे.

(३) वणी नगर परिषदेची सद्या सुरु असलेली पाणी पुरवठा योजना ही सन १९८५ ला पुर्ण केलेली आहे. सदरची योजना २५,००० एवढ्या लोकसंख्येकरीता तयार करण्यात आलेली होती. तथापि सन २०११ च्या जनगणनेनुसार वणी नगर परिषदेची लोकसंख्या, हद्दी बाहेरील लोकसंख्या तसेच तरंगती लोकसंख्या मिळून एकूण लोकसंख्या १ लाखाच्या जवळपास झाली असल्यामुळे सदर पाणी पुरवठा योजना ही वणी शहरात पाणी पुरवठा करण्यास सद्य:स्थिती असमर्थ आहे. तसेच शहरातील पाणी पुरवठा करणाऱ्य साठवण टाक्याची क्षमता (१८ लाख लिटर) ही सुध्दा अपुरी असल्यामुळे वणी शहरात एक दिवसा आड तास एवढाच पाणी पुरवठा होतो व शहरातील अंदाजे ५०% वसाहतीत शहरातील असलेल्या विविध प्रभागातील ट्युबवलेद्वारे पाणी पुरवठा केला जातो.

(४) होय.
(५) नगर पालिका स्तरावर सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.
(६) नगर पालिका स्तरावर सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

---

**पश्चिम विदर्भातील सुमारे १०० सिंचन प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्याबाबत**

**(४८) १५३७५ (०९-०४-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील सुमारे १०० सिंचन प्रकल्पांना जलसंपदा विभागाच्या उदासिन धोरणामुळे सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाली नसल्यामुळे पश्चिम विदर्भातील सिंचनाचा अनुशेष वाढला असल्याचे दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील ४८ सिंचन प्रकल्प हे वाशिम जिल्ह्यातील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाशिम जिल्हा मा. राज्यपालांनी निर्धारीत केलेल्या सिंचन अनुशेषाअंतर्गत येत असतांना सुध्दा २०१० पासुन या सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली. नसल्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत जवळपास तिप्पटीने वाढ झाली असून १ लाख हेक्टर जमीन सिंचनापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाशिम जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५)** :(१) नाही, वाशिम, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती या जिल्ह्यातील ५० सिंचन प्रकल्पाचे सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत. पैकी २२ प्रकल्पांना सन २०१२-१३ मधील व ३६ प्रकल्पांना सन २०१३-१४ मधील उपलब्ध अनुदान मंजुर प्रमा/सुप्रमा पेक्षा जास्त खर्च करण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्याप्रमाणे प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहे.

(२) सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केलेल्या ५० प्रकल्पापैकी ३१ प्रकल्प वाशिम जिल्ह्यातील आहेत.

(३) नाही, वाशिम जिल्ह्यातील मा.राज्यपालांनी निर्धारीत केलेल्या सिंचन अनुशेषांतर्गत असलेले २७ प्रकल्प व अनुशेषांव्यतिरिक्त ४ प्रकल्पांचे सुप्रमा प्रस्ताव शासनास प्राप्त असून दरसुचीतील दरवाढ, जमिनीच्या किमतीतील झालेली वाढ, व संकल्पचित्रातील बदल या कारणांमुळे किमतीत वाढ झाली आहे. सदर प्रकल्प पुर्ण झाल्यास एकूण १६९७८ हे सिंचन क्षमता निर्मिती होणार आहे.

(४) वाशिम जिल्ह्यातील ३ प्रकल्पाचे (कुत्तरडोह, खडकी, ब्रम्हा) सुप्रमा प्रस्तावास शासन निर्णय दि. ५/२/२०१५ अन्वये मान्यता दिली आहे. एक प्रकल्पास (हिवराखुर्द (सं) शा.नि. दि.२८.४.२०१५ अन्वये मान्यता दिली आहे ९/४/२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये ६ प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देवरी, आमगाव व सालेकसा (जि.गोंदिया) तालुक्यातील अनेक सिंचन प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४९) १५६९२ (०९-०४-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यातील ता.देवरी, ता.आमगाव व ता.सालेकसा येथील अनेक सिंचन प्रकल्प अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कालव्यांची योग्य दुरुस्ती नसल्याने व अपु-या अवस्थेत असल्याने पाणी शेतक-यापर्यंत पोहोचत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नादुरुस्त प्रकल्पांमुळे शेतक-यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतक-यामध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

सालेकसा तालुक्यातील बेवारटोला व देवरी तालुक्यातील ओवारा लघु प्रकल्पांचे बांधकाम पूर्णत्वाकडे आहे व पांढरवाणी उपसा सिंचन योजनेचे बांधकाम प्रगतिपथावर असून जून २०१७ अखेर पुर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

सालेकसा तालुक्यातील नवाटोला आणि देवरी तालुक्यातील सातबहिणी, सुंदरी, मुरदोली, पालांदुर (जमिनदारी) या ५ लघु प्रकल्पाच्या वन प्रस्तावास शासनाने तत्वत: मान्यता नाकारली आहे. आमगांव तालुक्यातील आसोली लघु प्रकल्पाचे काम स्थानिक लोकांच्या भुसंपादन विरोधामुळे बंद आहे.
(२) नाही.

ओवारा प्रकल्पावर सन २००८-२००९ पासुन व बेवारटोला प्रकल्पावर सन २०१३-२०१४ पासुन आंशिक सिंचन होत आहे. सदर बांधकामाधीन दोन प्रकल्पाचे काम पुर्णत्वाकडे असुन सन २०१५-१६ या वर्षात देखील सिंचनाचे नियोजन आहे.
(३) नाही.

आमगाव, देवरी व सालेकसा तालुक्यात पुर्ण झालेल्या १० प्रकल्प असून या प्रकल्पाद्वारे दरवर्षी सुरळीत सिंचन करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अंसातोषाची भावना दिसून आली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे गोपाळपुर (जि. अमरावती) येथील पेढीनदीला आलेल्या महापुरामुळे ग्रामस्थांच्या घराचे व शेतीचे नुकसान झाल्याबाबत**

**(५०) ३८१४४ (२२-०१-२०१६). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोपाळपुर (ता.जि.अमरावती) येथील पेढीनदीमुळे सन २००७ मधील महापुरामुळे ग्रामस्थांच्या घराचे व शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले होते तेव्हा गोपाळपुर येथील पेढी नदीचे खोलीकरण करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने गोपाळपुर पेढी नदीचे खोलीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०४-२०१६) :**(१) होय,

प्राप्त झाले आहे.

(२) सदर प्राप्त मागणीनुसार विभागाद्वारे सर्व्हेक्षण करुन पेढी नदी खोलीकरण व रुंदीकरण व दोन्ही बाजूने साधारणत: २ कि.मी. मध्ये बांध टाकण्याचे कामाचे रु. १६२.१५ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक मंडळ स्तरावर दि. १/२/२०१६ रोजी जलसंपदा विभागाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी सादर करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.